बागेमध्ये खेळती राहील. चिकू बागेतील झाडांच्या बुंध्यालगतची जागा नांगरून उलटीपालटी करावी. म्हणजे सुप्तावस्थेतील किडी प्रखर सूर्यप्रकाशाच्या सानिध्यात मारल्या जातील. चिकू बागेतील प्रादुर्भावग्रस्त फळे आणि झाडांचे अवशेष जागोजागी छोटे ढीग करून जाळावीत. बागेमध्ये निळ्या रंगाच्या प्रकाश सापळ्याचा हेक्टरी २ या प्रमाणात वापर करावा. या किडीच्या नियंत्रणासाठी शिफारशीनुसार, रासायनिक किटकनाशकांच्या एकूण चार फवारण्या पुढीलप्रमाणे कराव्यात.

पहिली फवारणी - पावसाळा संपताच (सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात) प्रोफेनोफॉस (४०टक्के प्रवाही) १ मिली प्रति लिटर पाण्यातुन

दुसरी फवारणी - एक महिन्याच्या अंतराने डेल्टामेथ्रीन (२.८ टक्के प्रवाही) १ मिली प्रति लिटर पाण्यातुन

तिसरी फवारणी – एक महिन्याने लॅम्बडा सायलोथ्रीन (५टक्के प्रवाही) प्रमाण - १ मिली प्रति लिटर पाण्यातुन

चौथी फवारणी – एका महिन्याने तज्ञांच्या सल्ल्याने करावी. सदर किटकनाशकांची फवारणी करण्यापुर्वी तयार फळे काढावीत.

•जुन्या झाडांचे पुनरुज्जीवन तंत्रज्ञान –

दोन झाडांमधील अंतर खूप जवळ किंवा ३० फुटांच्या आत असलेल्या जुन्या बागेमध्ये फांद्या दाटीने वाढलेल्या असतील अशा झाडांची योग्य पध्दतीने छाटणी करणे गरजेचे आहे. झाडांवरील बांडगुळे आणि रोगट फांद्या असतील तर त्या करवतीने कापून घ्याव्यात. झाडांची छाटणी करताना जमिनीपासून ५फुट उंचीवरील आडव्या गेलेल्या फांद्या काढून टाकाव्यात. तसेच झाडाचे मुख्य खोड २० ते २५ फुटांच्या वर कापावे. आडव्या फांद्यांमध्ये ज्या फांद्यांवर सूर्यप्रकाश पडत नाही, अशा फांद्या काढाव्यात. फांद्या कापल्यानंतर सूर्यप्रकाश जमिनीपर्यंत पोहोचायला हवा. बागेमध्ये आंतरमशागत करणे सुलभ होईल अशा पध्दतीने झाडांची छाटणी करावी. फांद्या कापल्यानंतर त्यावर बोर्डोपेस्ट लावावी.

फळांची काढणी व उत्पादन –

पक्व झालेले फळ तोडल्यास देठाच्या जागी निघणा-या चिकाचे प्रमाण अतिशय कमी असते. फळांच्या पृष्ठभागावर नखाने हळूवार ओरखडल्यास पिवळसर खाकी रंगाच्या रेषा उमटतात. फळांवर आलेली पावडरीसारखी बारीक लव पुसून काढल्यास तांबूस रंग दिसतो. ही सर्व लक्षणे पक्व फळामध्ये दिसतात. याउलट कच्च्या फळांवर ओरखडल्यास हिरवट रंग दिसतो. यावरून कच्ची फळे ओळखता येतात. पूर्ण वाढ झालेल्या झाडापासून साधारणतः १५०० ते ३००० फळे प्रत्येक झाडापासून मिळतात व झाडाचे उत्पादन ४० ते ५० वर्षांपर्यंत चालू राहते.

लेख संकलन

श्री. यशवंत जगदाळे
विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या),
कृषि विज्ञान केंद्र, बारामती

डॉ. सय्यद शाकीर अली
प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ,
कृषि विज्ञान केंद्र, बारामती

Agricultural Development Trust Baramati

चिकू लागवड व पुनरूज्जीवन तंत्रज्ञान

निर्मिती अर्थसहाय्य :

प्रकल्प संचालक आत्मा, पुणे

कृषि भवन, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५
फोन : ०२०– २५५३०४३१
E-mail : pdatmapune@gmail.com

तांत्रिक लेखन व प्रकाशन:

कृषि विज्ञान केंद्र, बारामती

माळेगांव खुर्द, बारामती, पुणे – ४१३ ११
फोन : ०२११२-२५५२०७, २५५२२७
E-mail:kvkbmt@yahoo.com
Web: www.kvkbaramati.com

चिकू लागवड व पुनरूज्जीवन तंत्रज्ञान

चिकू हे अतिशय काटक फळझाड असून कमी खर्चात व कमी मेहनतीत बयाच वर्षापर्यंत (३० ते ४० वर्ष) उत्पन्न देत राहते. नेहमी हिरवेगार सतत वाढणारे आणि मधूर फळे देणारे बहुवर्षीय झाड आहे. चिकू फळाला बाजारात सतत मागणी असते. हलवा, चॉकलेट, जाम व आईसक्रीम तयार करणेसाठी चिकूचा वापर केला जातो.

चिकूच्या लागवडीसाठी उत्तम निच-याची, खोल मध्यम काळी जमीन लागते. उष्ण व दमट हवामानात चिकू झाडाची वाढ व उत्पादन चांगले मिळते. लागवडीसाठी प्रामुख्याने कालीपत्ती व क्रिकेटबॉल या वाणांचा वापर केला जातो. चिकूची रोपे खिरणी खुंट वापरून भेट कलम किंवा शेंडा कलम पध्दतीने तयार करतात. चिकूची लागवड १०x१० मीटर अंतरावर करतात. प्रति हेक्टरी १०० झाडे बसतात.

•नवीन चिकू बागेचे व्यवस्थापन -

सुरूवातीच्या दोन वर्षात कलमांच्या खुंटावरील येणारी फूट काढून टाकावी.लागवडीपासून पहिली तीन वर्ष कलमावरील फुले काढून टाकावीत. चिकू कलमांची पूर्ण वाढ होण्यास ८ ते १० वर्षांचा कालावधी लागतो. तेव्हा पहिल्या ६ वर्षांच्या कालावधीमध्ये चिकूच्या लागवडीत आंतरपिके म्हणून भाजीपाला, अल्पायुषी फुलझाडे, फळझाडे किंवा द्विदल धान्यांची लागवड करता येते. पावसाळ्यात तणांचा प्रादुर्भाव वाढतो. त्यावर नियंत्रण ठेवावे. झाडाच्या खाली वाकलेल्या, जास्त गर्दी झालेल्या फांद्या छाटून घ्याव्यात. त्यामुळे सूर्यप्रकाश झाडामधून खालपर्यंत येतो. तसेच हवा खेळती राहिल्याने शेंगांचा प्रादुर्भाव कमी राहण्यास मदत होते.

•खत व्यवस्थापन –

चिकूच्या १ वर्षाच्या झाडाला १ घमेले कुजलेले शेणखत तसेच ३०० : ९०० : ३०० ग्रॅम युरीया, सिंगल सुपर फॉस्फेट व म्युरेट ऑफ पोटॅश दोन हप्त्यात सम प्रमाणात द्यावे. त्यापैकी पहिला हप्ता ऑगस्टमध्ये द्यावा.

१ वर्षाच्या झाडाला खताची मात्रा वरील मात्रेच्या दुप्पट व ३ वर्षाच्या झाडाला तिप्पट द्यावी. पुर्ण वाढलेल्या झाडाला (२०वर्षाच्या) ६:१८:६ किलो या प्रमाणे युरिया, सिंगल सुपर फॉस्फेट व म्युरेट ऑफ पोटॅशची मात्रा प्रतिझाड द्यावी. चांगले कुजलेले शेणखत ५० कि.प्रतिझाड प्रतिवर्षी खरिपाच्या सुरुवातीला बांगडी पध्दतीने द्यावे.

•छाटणी तंत्रज्ञान –

चिकू हे वर्षभर उत्पादन देणारे झाड असून त्यावर सतत नवीन मोहोर व फळे येत असतात. २० वर्षाच्या पुढील वयाच्या झाडावर फांद्यांची संख्या वाढल्याने झाडाची उत्पादकता कमी होते. अशावेळी घनदाट चिकू बागेमध्ये मध्य फांदीची छाटणी १ मीटर पर्यंत करावी. छाटणी करीत असताना झाडाचा आकार व वाढलेली उंची याचा विचार करून छाटणी करावी. झाडाच्या बुंध्यापासून सरळ वाढणारी पालवी काढून टाकावी जमिनीला लागणा-या फांद्या एकाच उंचीला कापाव्यात. छाटणी केल्यानंतर चिकू बागेमध्ये चांगली हवा खेळती राहते. तसेच, सूर्यप्रकाश सुध्दा चांगल्या प्रमाणात झाडांना उपलब्ध होतो. त्यामुळे कीड-रोगांचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात होतो.

•चिकू बागेतील महत्त्वाच्या किडींचे व्यवस्थापन –

चिकू फळातील बी पोखरणारी अळी –

या किडीचा प्रादुर्भाव पावसाळा संपताच (म्हणजे सप्टेंबरपासून ते जानेवारीपर्यंत) जास्त प्रमाणात आढळून येतो. या किडीचे मादी पतंग पानावर तसेच फळांवर अंडी घालतात. पूर्ण वाढलेली अळी गर्द गुलाबी रंगाची असून ८ ते ९ मि.मि. लांबीची असते. या अळीची संपूर्ण वाढ फळाच्या आत बीमध्ये पूर्ण होते. त्यानंतर बीचे कठीण कवच पोखरून फळाला २-३ मि.मि. व्यासाचे छिद्र पाडून बाहेर येते. आपल्या तोंडावाटे बाहेर टाकलेल्या चिकट धाग्याला लोंबकळत पानाची कडा दुमडून किंवा जमिनीवरील मातीत पालापाचोळ्यात शिरून कोषावस्थेत जाते. कोष गडद गुलाबी किंवा तपकीरी रंगाचे असतात.

व्यवस्थापन –

चिकू झाडाची वेळोवेळी योग्य छाटणी करून बाग विरळ ठेवावी. सर्व फांद्यांना सूर्यप्रकाश चांगला मिळून हवा